# उंट पपेट सूचना

उंटाचे साहस हया व्हीबीएस मध्ये दररोज तुमच्यासाठी कॅमेलॉट आणि कॅमेलीया ह्यांच्यामध्ये पपेट शो लिहिलेला आहे. तुमच्या व्हीबीएस मध्ये हया उंटाची ओळख करून घेणे मुलांना आवडेल. हे दोन पपेट किंवा कटपुतळी तयार करण्यासाठी तुम्हाला सूचना देण्यासाठी आम्ही उत्साहित आहोत. वेगवेगळे साहित्य वापरण्यास किंवा तुमच्या क्षेत्रातील उपलब्ध स्थानीक स्वस्त सामान वापरण्यासाठी तुम्हाला मोकळीक आहे.

1. तुम्हाला आवश्यक असलेले साहित्य गोळा करा.

- कैची
- पेन्सिल (कापडावर नमूना घोटण्यासाठी)
- डिंक (लवकर कार्य करणारा जो कापडावर चालेलः सिलिकॉन किंवा हॉट ग्लू)
- आत भरण्यासाठी साहित्य, क्वीलटच्या आत भरण्याचे साहित्य चांगले काम करते 1/2 मिटर
- पुठ्ठा (तोंडाला मजबूत करण्यासाठी)
- मोठया नाकाची सूई
- हलका धागा
- लहान पॉमपॉम (फुगलेले बॉल)
- 1 मिटर उंटाच्या रंगाचे फेल्ट किंवा जाड कापड
- गडद रंगाचे फेल्ट किंवा जाड कापड (काळे किंवा कत्थे नाकासाठी), लाल फेल्ट (तोंड) आणि कानांसाठी गुलाबी ऐच्छिक

2. पाडीएफ नमूना उतरावा आणि 11x 17 किंवा ए3 च्या कागदावर दोन संच छापा (किंवा लहान कागदावर छापा आणि एकत्र चिटकवा). पत्र किंवा ए4 कागदावर लहान छापा.
   - उंटाचे डोके नमूना
   - तोंडाचा नमूना
   - नाकाचा नमूना
   - कानांचा नमूना

उंटासाठी आवश्यक असलेले कापड विकत घ्या. आम्ही फेल्ट कापडाची शिफारस करतो कारण ते मजबूत असते आणि ज्यास्त हालत नाही. परंतू तुमच्या क्षेत्रामध्ये परवडण्यासारखे जे कापड आहे ते तुम्ही वापरू शकता. आम्ही कडक किंवा मजबूत कापडाची शिफारस करतो.

कापडाच्या प्रमाणाचा अंदाज खाली दिलेला आहे, कापड घेण्यासाठी दुकानात जाल तेव्हा नमूना तुमच्या बरोबर घेऊन या जेणे करून पुरेसा कापड तुमच्या कडे राहिला.

उंटाच्या रंगाचा, हलका कत्था किंवा तपकिरी 1 मिटर


लाल 1/8 मिटर

कत्था किंवा काळा 1/8 (शक्य असल्यास कमी)


धागाः 1/4 पुडा केसांसाठी कत्था रंग.

1/3 पुडा वेगवेगळया रंगाचा 13 मिमी आकाराचे गुच्छे (गोल गुच्छे)

## तुमचे पपेट तयार करणे




1. शरीर व तोंडाचे कापड कापा
    - शरीरासाठी दोन तुकडे कापा
    - तोंडासाठी दोन तुकडे कापा
2. डोक्याचे तुकडे एकत्र शिवा परंतू तोंड आणि तळ जिथे तुमचा हात जाईल ते उघडे ठेवा.
3. तोंडांचे दोन तुकडे सर्वात वरच्या बाजूला एकत्र शिवा, सरळ बाजू सोडत. तोंडांच्या खाली तसेच करा. सरळ कडेची लहान बाजू बाजूच्या उघडया बाजूला शिवा. लांब कडा तोंडाच्या आतील भागासाठी तसेच ठेवा.
4. कापडाची आतील बाजू बाहेर ठेवत, तोंड उघडा आणि तोंडांचा लाल कापड उघडया बाजूला टाचा. तोंडाचा लाल भाग जिथं तोंडाचे कोपरे जिथे असले पाहिजे तिथे अंदाज घेत अर्धा दुभागा निट उघडण्यासाठी बरोबर जोडले पाहिजे. डोक्याला जोडत, लाल तोंडाच्या भोवती व्यवस्थि शिवा.




5. बरोबर बाजू बाहेर काढत डोके फिरवा जेणे करून सर्व शिवणा आतील बाजूला राहतील. तोंडाच्या आतल्या भागासाठी पुठ्ठा कापा. जर कॅरूगेटेड किंवा घडया असलेला पुठ्ठा वापरणार असाल तर नमूना आडवा आखा, घडया असलेल्या रेषांवर नको जिथे तो सहज रित्या वाकेल. ते अर्धे कापा आणि 2 सेमीची जागा सोडत वर खाली जोडा.
6. मध्ये भरण्यासाठी दोन तुकडे कापा (उशीतला कापूस) तोडां एवढा लांब, परंतू लांबट, गुंडाळता येईल असा नाकाचा वरचा आणि खालचा भाग भरणाच्या तुकडयांनी भरा. नाक कडक करण्यासाठी

भरपूर वापरा. तुमचे हात पुठ्ठयाच्या तुकडयांना लागले पाहिजे जेव्हा तुम्ही पपेट वापराल. डोक्यासाठी दुस-या मोठया तुकडयाने तसेच करा, तोंडात व डोक्यात ते नीट टाका, आणि त्यातील काही मानेकडे खाली येऊ दया. पपेटचा उपयोग करत असतांना तुमचा हात मानेच्या समोर आणि तोंडाच्या पहिल्या भागात राहिल.

7. तुमच्या हाताला धागयाचे काही मिटर गुंडाळा, तुमचे बोटं फाकवत जेणे करून ते काढण्यासाठी सोपे जाईल. त्याला मधात बांधा आणि ''केसांचा'' गुच्छ तयार करण्साठी लूप पसरवून घ्या आणि मग ते सिलिकॉन डिंकाने डोक्याच्या वर चिटकवा.
8. जर पापण्या हव्या असतील (जसे आपण कॅमेलॉटला वापरल्या) तर उंटाच्या रंगाच्या कागदी नमून्यावर त्याचे चित्र काढा आणि ते कापा. प्रथम चेह-यावर डोळे चिटकवा, नंतर त्यावर पापण्या चिटकवा तुमच्या बोटाचा उपयोग त्याला मध्ये थोडे उंच करण्यासाठी करत जेणे करून ते खाली चपटे चिटकणार नाही. जर कॅमेलीया तयार करत असाल तर, विकत घेतलेले किंवा गडद रंगाच्या कापडातून तयार केलेल्या पापण्या लावू शकता.
9. कान दिलेल्या नमून्या प्रमाणे मोठे किंवा लहान करण्यासाठी छाटले जावू शकतात. आपण केले तसे कॅमेलीयासाठी गुलाबी टाकणे हा पर्याय आहे.
आपण कानाच्या बाहेरील किनारीला गोठ चिटकवीली हयासाठी की उंटाच्या रंगाच्या कापडाला गुलाबी कापड लावल्यावर त्याला आधिक भरीवपणा आणि बळ यावे. तुम्हाला कान चपटे किंवा आत खोचलेले आणि थोडेसे गोल पाहिजे आणि ते डोक्याला कुठे लावायचे ते ठरवा. त्यांना पटकन चिटकवण्यसासाठी हॉट ग्लू चांगले काम करतो.



10. कॅमेलीयाचे नाक केवळ काळया कापडावर जो नाकाचा नमूना दिला आहे त्याच्या भोवती कापावे आणि आणि तिच्या चेह-यावर दोन लावावे. कॅमलेटच्या नाकाला काळया ''नाकपुडया'' झाकण्यासाठी आणखी एक नाक आहे, लहान काठाच्या खाली जोडावे हयामूळे पपेटच्या नाकाला मोठा व अधिक आकारमाण प्राप्त होईल.



11. कॅमेलीयाचा लगाम आणि सजावट ही सुईत भरतकामाचा धागा टाकून आणि त्याला गुच्छे शिवून, त्यात थोडे अंतर ठेवून तयार केलेला आहे. त्याला आकर्षक काठ लावा, कोणत्याही प्रकारे जसे तुम्हाला आवडेल तसे आणि त्याला जागेवर चिटकवा. कॅमलेटसाठी कुरळी रिबीन घेऊन तसेच करता येईल. चार बोटांना कुरळी रिबीन गुंडाळून, तीला सरकवून आणि एका बाजूला चांगले पक्के बांधून लहान गोंडे तयार केले आहेत. विरूध्द बाजू कापून रंगीत गोंडे तयार करा. हे त्याच्या लगामाला चिटकवा, त्याच्या नाकाभोवती बांधण्यासाठी कुरळया रिबीन पासून तयार केलेले.

12. तुमच्या पपेटला शोभेल असा आवाज विकसित करण्याची मजा घ्या.